**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता,**

**मार्ग प्रकल्प विभाग, सांगली**

**उत्तर शिवाजीनगर, धान्य गोडाऊन शेजारी, सांगली**

**दुरध्वनी क्र.०२३३/२३७२०१५**

**फॅक्स -०२३३/२३७३२३३**

**email address :** rpsangli.ee@mahapwd.com


# नागरिकांची सनद

| अनुक्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | नागरिकांची जबाबदारी | २ |
| ३ | कार्यालयाची रचना | २ |
| ४ | गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण | ३ |
| ५ | नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन | ३ |
| ६ | नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी | ४ |
| ७ | माहिती अधिकार अधिनियम-२००५ प्रकरणे | ४ |
| ८ | उपविभागीय कार्यालयाची माहिती | ५ |
| ९ | वृक्ष तक्ता | ६ |

## प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास सुमारे १५० वर्षाची गौरवशाली पंरपरा आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत सांगली मार्ग प्रकल्प विभाग, सांगली हे कार्यालय सुमारे ४६ वर्षापासून कार्यरत आहे.

हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधिलकी सांगली मार्ग प्रकल्प विभाग, सांगली या सनदेद्वारे जाहीर करीत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपुर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाईक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन, ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे.

१) या कार्यालयामार्फत शासकीय इमारतींची (कार्यालयीन तसेच निवासी गाळे) नवीन बांधकामे सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रके तयार केली जातात.

२) रस्ते विकास योजनेतील रस्त्यांची नविन बांधकामे सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल यांचे सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करणे व संकल्प चित्र मंडळाकडून मंजूरी घेतली जाते.

३) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

४) या कार्यालयात दर सोमवारी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करण्यात येते.

५) **“माहितीचा अधिकार अधिनियम”** अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करून देणे.

६) सर्व कार्यालयातून कर्मचारीवर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७) विभागाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

८) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

९) संगणीकरणाबाबत सर्व मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये तसेच मंत्रालय यांचेशी नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. विभागाची विविध माहिती (www.mahapwd.com) या वेबसाईटवर अद्यावत उपलब्ध करणे.

१०) **बांधिलकी :** वरील सर्व कर्तव्य पार पाडताना मार्ग प्रकल्प विभाग, सांगली हे सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवेल.

अ) सौजन्यपुर्ण व मदतीची वृत्ती ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

ब) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

## **२) नागरिकांची जबाबदारी :**

* शासकीय अधिकारी -कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपुर्वक असावी.
* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावीत.
* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
* विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्यातचा आग्रह धरू नये.
* सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
* नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करू नयेत.
* रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजीचे जतन ही नागरिकांची जबाबदारी राहील.
* नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

**कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सांगली या कार्यालयाची रचना.**

कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, सांगली या कार्यालयाचे अधिपत्याखाली एकूण तीन उप विभाग आहेत. विभागीय कार्यालयातील क्षेत्रिय कामे या उप विभागाकडून पार पाडली जातात. कार्यकारी अभियंता हे विभागीय कार्यालयाचे प्रमुख आहेत. तर उप अभियंता हे उपविभागाचे कार्यालय प्रमुख आहेत. कार्यकारी अभियंता यांचे आदेशानुसार उप अभियंता हे उपभिागाकडून कामाची अंमलबजावणी करतात.

विभागीय कार्यालयात प्रकल्प शाखा / रेखा शाखा / लेखा शाखा / भांडार शाखा / आस्थापना शाखा अशी शाखावार विभागणी केली आहे, विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता सोबतचे **परिशिष्ठ 'ब'** मध्ये दर्शविला आहे.

**या शाखांचे प्रमुख अधिकारी / कर्मचारी खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | शाखा | प्रमुख अधिकारी | अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|
| १. | प्रकल्प शाखा | उप कार्यकारी अभियंता | शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / कनिष्ठ अभियंता (प्रकल्प अभियंता) |
| २. | रेखा शाखा | आरेखक | सहाय्यक आरेखक / अनुरेखक |
| ३. | लेखा शाखा | विभागीय लेखाधिकारी | वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक |
| ४. | आस्थापना शाखा | प्रथम लिपीक | वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक |
| ५. | भांडार शाखा | भांडारपाल | सहाय्यक भांडारपाल / कनिष्ठ लिपीक |

कार्यकारी अभियंता, यांचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे सांगली व कोल्हापूर जिल्हा आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक जिल्हयात उप अभियंता असतो. राज्यक्षेत्र व स्थानिकक्षेत्र (जि.प.) यांचेकडील कामासाठी स्वतंत्र उप अभियंता असतात.

कार्यकारी अभियंता, यांचे अधिकार क्षेत्रातील मार्ग प्रकल्प विभाग, सांगली हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. या विभागामार्फत नवीन रस्त्याचे सर्वेक्षण, अंदाजपत्रके तसेच नवीन पूल बांधणे या साठी लागणारी सर्व प्राथमिक माहिती तयार करणे तसेच या दोन्ही जिल्हामध्ये नवीन इमारती बांधकामाचे प्राथमिक अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे उप विभागीय अभियंता हे शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे मार्फत करुन घेतात व ते विभागीय कार्यालयास अहवाल सादर करतात.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा मार्ग प्रकल्प विभाग, सांगली पुरवित असतो. कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादिचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते.

## (अ) माहितीची सुलभता

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावरून **(www.mahapwd.com)** तसेच वेळोवेळी प्रसिध्द केले जाणा-या पत्रकाद्वारे जनतेला आकडेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध होईल. मुख्यत्वेकरुन या संकेतस्थळावर निविदासुचना, परिपत्रके व कार्यालयांची माहिती दिली आहे.

## (ब) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी त्यांची गा-हाणी / तक्रार असेल त्या उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ शाखा अभियंता यांचे विरूध्द गा-हाणे / तक्रार असल्यास उपविभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे उप अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, विभाग कार्यालयातील एखादया अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द गा-हाणे / तक्रार असल्यास संबधित शाखा प्रमुखाकडे (उप कार्यकारी अभियंता / विभागीय लेखाधिकारी / आरेखक / प्रथम लिपीक / भांडारपाल) गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणे / तक्रारींचे निराकरण ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणे / तक्रारी नोंदविण्यासाठी या कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल. गा-हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा **''ई-मेल''** द्वारेही नागरीक मांडू शकतात.

## (क) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा वेळोवेळी कार्यकारी अभियंता यांच्याकडून घेण्यात येईल.

## (इ) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करून, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## (ई) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

मार्ग प्रकल्प विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास हा विभाग कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करून आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

मार्ग प्रकल्प विभाग, सांगली हे कार्यालय खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

## माहिती अधिकार अधिनियम - २००५ प्रकरणे

अ) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे विभागीय कार्यालयाशी संबंधित माहिती असेल तर संबंधित कर्मचा-यांकडिल माहिती एकत्रित करुन अर्जदारास ३० दिवसाचे आत माहितीबाबत, शुल्क भरण्यास कळविले जाते अथवा माहिती पाठविली जाते.

ब) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे ब-याच वेळेस इतर प्राधिकरणाशी संबंधित असल्यास माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम (३) खाली ५ दिवसाचे आत वर्ग करणेत येतो.

क) माहिती अधिकारात आलेले अपील अर्जावर अपील सुनावणी ही तीस दिवसाचे आत घेवून निर्णय दिला जातो. रेखा शाखेतील संबंधित कामाच्या कार्यपुर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ ‘क’ मध्ये नमूद केले आहे.

**कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, सांगली यांचे अधिपत्या खालील उपविभागाची माहिती उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालयाची माहिती**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पत्ता/दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | उप अभियंता, मार्ग प्रकल्प उप विभाग, सांगली | उत्तर शिवाजीनगर, धान्य गोडाऊन शेजारी, सांगली ०२३३/२३७२०१५ |
| २ | उप अभियंता, मार्ग प्रकल्प उप विभाग गडहिंग्लज मु. कोल्हापूर | टाऊन हॉल, सी. पी. आर. हॉस्पीटल समोर, कोल्हापूर |
| ३. | उप अभियंता, इमारती प्रकल्प सर्व्हेक्षण उप विभाग क्र.२, कोल्हापूर | भवानी मंडप, कोल्हापूर |

## परिशिष्ठ-‘ब’

## वृक्ष तक्ता

